# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०१/२०२५ (गुरूवार) सायंकाळ**


---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन अरोली :— दिनांक १६/०१/२५ रोजी अरोली पोलीस, हददीत पेट्रोलिंग करीत असतांना पोलसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी अरोली येथे नाकाबंदी केली असता एक संशयीत निळया रंगाचा टाटा कंपनीचा बारा चक्का ट्रक क्रमांक एम.एच ४९ बी व्ही ००७७ हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक आरोपी नामे अश्विन तिलकचंद कोसरे,वय २५ वर्षे, पत्ता. डोंगरला ता तुमसर जि भंडारा याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले.तसेच रेतीची वाहतुक नेहाल केशव खोब्रागडे रा दुर्गानगर,ता तुमसर जि भंडारा यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ६ ब्रास रेती किंमती ४५,०००/— रूपये ,२) मोबाईल किंमती १०,०००/— रूपये आणि २) टाटा कंपनीचा बारा चक्का ट्रक क्रमांक एम.एच ४९ बी व्ही ००७७ किंमती ५५,००,०००/— रूपये असा एकुण ५५,५५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

ट्रक चालक आरोपी नामे अश्विन तिलकचंद कोसरे,वय २५ वर्षे, पत्ता. डोंगरला ता तुमसर जि भंडारा (चालक) आणि नेहाल केशव खोब्रागडे (मालक) रा. दुर्गानगर,ता तुमसर जि भंडारा याच्या विरूध्द पोस्टे अरोली येथे कलम ३०३(२),४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपी क्र १ याला अटक करण्यात आली आहे.गुन्हयाचा पुढील तपास अरोली पोलीस करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर